कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांना सध्याच्या पदावरील १२ वर्षाची नियमित सेवा केल्यानंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/३७४००७०/९९७/२०२६
अहिल्यानगर दिनांक :- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. साप्रवि कडील निर्णय क्र. एस.आर.व्ही.१०९५/प्र.क्र.९५/बारा, दिनांक ०८/०६/१९९५
२. साप्रवि कडील निर्णय क्र. एस.आर.व्ही.१०९५/प्र.क्र.९५/बारा, दिनांक ०१/११/१९९५
३. साप्रवि कडील निर्णय क्र.एस.आर.व्ही.१०९६/प्र.क्र.३३/९५/बारा, दिनांक २०/३/१९९७
४. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११९९/प्र.क्र.२/९९ सेवा-३ दिनांक २०/०७/२००१
५. वित्त विभाग यांचेकडील निर्णय क्र. वेतन/११०९/प्र.क्र.४४/सेवा ३ दिनांक ०१/०४/२०१०
६. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्रक्र-४१/सेवा-३ दि.०५/०७/२०१०
७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, परिपत्रक क्र.सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र.५९०/ मावक ५ दिनांक ०८/०६/२०११
८. ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबईकडील शासन निर्णय क्र.डिएसआर-२०१३/प्र.क्र.३० आस्था-०५ दिनांक ०९ सप्टेबर २०१४
९. गठीत निवड समितीचे मंजूर इतिवृत्त दिनांक १६/१०/२०२६

गट क संवर्गातील कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावरील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे असलेली कुंठितता घालविणे संबंधिची योजना उपरोक्त संदर्भान्वये विहित केलेल्या योजनेच्या अटी व शर्तींना अधिन राहुन सरळसेवेने प्रविष्ट झालेल्या अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) (वर्ग-३) या कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ पदाची वेतन संरचना अनुज्ञेय असल्याने खालील कर्मचा-यांना त्यांच्या नावापुढे स्तंभ ५ मध्ये नमुद केलेल्या तारखेपासुन पदोन्नती साखळीतील वरीष्ठ पद - वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) अस्तित्वात असल्याने सदर पदाची वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२००/- अधिक ग्रेड वेतन २४००/- लागु करणेस खालील अटी व शर्तीवर मान्यता देणेत येत आहे.

अ क्र.	कनिष्ठ सहाय्यकाचे नाव	कार्यालयाचे नाव	कनिष्ठ सहाय्यक पदावरील हजर दिनांक	पदोन्नती साखळीतील १२ वर्षे नियमित सेवेनंतर देय वेतनश्रेणी मंजुर केल्याचा दिनांक
१	२	३	४	५
१	श्री तखतमल केशरचंद गुगळे	शिक्षण विभाग पं.स. अहिल्यानगर	२१/०४/१९९९	२१/०४/२०११

अटी व शर्ती :-

१. शासन निर्णय क्र.वेतन/११०९/प्र.क्र.४४/सेवा३ दि.०१/०४/२०१० मुंबई अन्वये सुधारित आश्वासित प्रगती योजना वेतन बँड (१५६००-३९१००) + ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणा-या कर्मचा-यांना लागू राहील.
२. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ १२ वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येईल.
३. कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली कर्मचा-यांनी घेतलेला लाभ हा या योजनेखालील कर्मचा-यांना पहिला लाभ समजण्यात येईल.

..२

४. उपरोक्त शासन निर्णय क्र.६ मधील परिच्छेद ४ नुसार कर्मचा-यास पहिला लाभ मंजुर केल्यानंतर ६ वर्षांनी कर्मचा-याच्या गोपनीय अहवालांची तपासणी केल्यानंतर गोपनीय अहवालातील त्याला अनुकुल असलेल्या कोणत्याही ३ गोपनीय अहवालांची सरासरी पहिल्या लाभाच्या प्रकरणी "ब" (चांगली) असणे आवश्यक राहील, गोपनीय अहवालांची ही सरासरी प्रतवारी प्राप्त न केल्यास तसेच, कर्मचारी वैद्यकीय अथवा अन्य कारणास्तव अपात्र ठरल्यास त्याला मंजुर करण्यात आलेला यथास्थिती पहिला लाभ काढून घेण्यात येईल व अशा लाभांची वसुली करण्यात येईल. सदर वसुलीची संपुर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिका-यांची राहील.

५. या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना अनुज्ञेय होत असल्याने सर्वसाधारण पदोन्नतीसाठीच्या आवश्यकता पुर्ण करणे अपेक्षित आहे. त्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक राहील.

६. कर्मचा-यांस या योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी एक अथवा दोन वेळेस पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नती साखळीत पुढील पदोन्नती संवर्ग उपलब्ध नसेल तर तो ज्या पदाच्या वेतनसंरचेत वेतन घेत आहे ते पद जणू एकाकी पद आहे असे समजून एकाकी पदास ज्याप्रमाणे या योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येतो त्याप्रमाणे पहिला लाभ मंजूर करण्यात येईल.

७. या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपुर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजुर करण्यात येईल. तथापि तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. मात्र ज्या कर्मचा-यास दोन प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्या आहेत त्या कर्मचा-यास या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल.

८. सुधारीत सेवातंर्गत आश्वासीत प्रगती योजनेतंर्गत पहिला लाभ मंजूर झाल्याने कर्मचा-यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(१) नुसार करण्यात यावी.

९. पहिला लाभ मंजूर केल्यांनतर संबंधीत कर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्याने पदोन्नती नाकारली तर त्यांचा पहिला लाभ काढून घेतला जाईल. व अशा कर्मचा-यांचा दुस-या लाभासाठी विचार केला जाणार नाही तसे कर्मचा-यांचे बंधपत्र घेवून दप्तरी ठेवणेत यावे. सोबत बंधपत्र नमुना जोडला आहे.

१०. सदर आदेशाची नोंद कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी. तसेच सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र .....202611040402 00..... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 16:12:15

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री तखतमल केशरचंद गुगळे, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, पं.स.अहिल्यानगर
द्वारा व प्रत:- गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर

प्रत :- महितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव

१. संबंधित कार्यालय प्रमुख.
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. निवड नस्ती

कर्मचा-याचे नांव -
पदनाम -
कार्यालय -
दिनांक -

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

विषय- कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीच्या योजनेअंतर्गत वरच्या पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत.

महोदय ,

मी खालील सही करणार श्री / श्रीम ..... लिहून देतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन /१११९/ प्र क्र- २/९९/सेवा-३ दिनांक २० जूलै २००१ व क्र. वेतन/११०९/प्र.क्र.४४/सेवा ३ दि.०१/०४/२०१० नुसार ..... या पदाची वेतनश्रेणी रूपये ..... पात्र ठरत आहे. या पूर्वी '..... या पदाच्या पदोन्नतीसाठी नकार दिलेला आहे / नाही.

मी सदरची निवेदन सत्य प्रतिज्ञेवर लिहून दिलेले असून या बाबत नंतर असत्यता आढळून आल्यास मी याबाबत होणा-या परिणामास जबाबदार आहे.

आपला विश्वासू

स्वाक्षरी/-
(कर्मचा-याचे नाव)

समक्ष-

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी व पदनाम

(टिप - कार्यालय प्रमुखाची यावर स्वाक्षरी आवश्यक आहे.)

प्रपत्र- १

- बंधपत्र -

मी खाली सही करणार श्री ..... पदनाम ..... कार्यालय ..... लिहुन देतो की, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.वेतन/११९९/ प्र क्र- २/९९/सेवा-३ दिनांक २० जूलै २००१ व क्र. वेतन/११०९/प्र.क्र.४४/सेवा ३ दिनांक ०१/०४/२०१० अन्वये गट -क / गट-ड पुर्वीचे वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नती साखळीतील ..... या पदाची ..... ही वेतनश्रेणी मिळण्यास पात्र ठरत आहे. सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार दि. / /२० पासून ..... या पदाची वेतनश्रेणी मिळाल्यानंतर नियमित पदोन्नतीसाठी मी पात्र ठरुन ..... या पदावर पदोन्नती मिळाल्यास मी सदर पदोन्नती स्विकारीन परंतू अशा प्रकारे नियमित पदोन्नतीसाठी नकार दिल्यास अथवा भविष्य काळात मी पदोन्नतीसाठी अपात्र ठरल्यास मला दि / / पासून दिलेली वरिष्ठ वेतनश्रेणी काढून घेण्यास माझी संमती आहे.

दिनांक / / पासून दिलेली वेतनश्रेणी यापुर्वी पदोन्नतीस नकार दिलेला असेल अथवा तिन पेक्षा अधिक पदोन्नती घेतल्या असतील तर मला चुकीने मिळालेली .....या पदाची वेतनश्रेणी काढून घेण्यास हरकत नाही.

सदरच्या बंधपत्रातील व आदेशात नमुद असलेल्या अटी मी पुर्णपणे वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक आहेत. याबाबत मी कोणत्याही बाबतची तक्रार करणार नाही.

दिनांक / /

स्थळ :-

स्वाक्षरी/-

(कर्मचा-याचे नांव व पदनाम)

प्रतिस्वाक्षरी

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

प्रपत्र- २

- बंधपत्र -

मी खालील सही करणार श्री ---------- लिहून देतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन /११९९/ प्र क्र- २/९९/सेवा-३ दिनांक २० जूलै २००१ व क्र. वेतन/११०९/ प्र.क्र.४४/सेवा ३ दि.०१/०४/२०१० अन्वये मी दिनांक / / पासून ---------- ---------- या पदाची वेतनश्रेणी रूपये ---------- ही वेतनश्रेणी घेण्यास पात्र ठरत आहे. सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार वरिष्ठ वेतन श्रेणी मिळाल्यानंतर नियमित पदोन्नतीसाठी मी पात्र ठरल्यास नियमित पदोन्नती मी स्विकारीन. आणि नियमित पदोन्नती मिळाल्यानंतर नियमित पदोन्नतीस नकार दिल्यास अथवा भविष्यकाळात मी पदोन्नतीस अपात्र ठरल्यास मला मिळालेली वरिष्ठ वेतनश्रेणी काढून घेण्यास माझी संमती आहे.

मला मिळालेल्या वरिष्ठ वेतनश्रेणी पूर्वी पदोन्नतीस नकार दिलेला असेल अथवा दोन पेक्षा जास्त पदोन्नती घेतल्या असतील तर मला चुकीने मिळालेली वरिष्ठ वेतनश्रेणी काढून घेण्यास माझी हरकत नाही.

सदरच्या बंधपत्रातील आणि आदेशामध्ये नमूद असलेल्या अटी मी पूर्णपणे वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक आहेत. याबाबत मी कोणत्याही प्रकारची तक्रार करणार नाही.

आपला विश्वासू

दिनांक
स्थळ :-

स्वाक्षरी/-
(कर्मचा-याचे नाव)

समक्ष-

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी व पदनाम